REGISTERED No. B. 3434






# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ८ फेब्रुवारी, १९५० | अंक ६


श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**साखर कामगारांची परिषद्**—इंडियन नॅशनल शुगर मिल वर्कर्स फेडरेशन ह्या संघटनेची ४ थी वार्षिक परिषद् बाराबंकी येथें ता. २५ व २६ फेब्रुआरी ह्या दिवशीं भरणार आहे. श्री. हरिहरनाथ शास्त्री हे परिषदेचे अध्यक्ष आहेत. संयुक्त-प्रांताचे मुख्यमंत्री पं. गोविंद वल्लभ पंत ह्यांना परिषदेचें उद्घाटन करण्याची विनंति करण्यांत आली आहे.

**१४१ वर्षांचा वृद्ध**—रशिआंतील अझरबैजन ह्या उपराज्यांत १४१ वर्षांचा एक वृद्ध हयात असल्याचें समजतें. ह्या गृहस्थाची बायकोहि ९१० वर्षांची आहे. ज्या गावांत हा गृहस्थ रहातो त्यांतील सर्व रहिवासी म्हणजे त्याचा स्वतःचाच वंशविस्तार आहे. आपल्या आयुष्याचा तीन चतुर्थांश हिस्सा कष्टमय गेला, परंतु सोव्हिएट क्रांति झाल्यावर मात्र सुखाचे दिवस मिळाले असें त्याचें म्हणणें आहे.

**दरभंगा येथें यांत्रिक नांगरणी**—दरभंगा जिल्ह्यांतील पडीक जमीन लागवडीखालीं आणण्यासाठीं लवकरच यांत्रिक नांगर वापरले जाणार आहेत. दर एकरामागें एका वर्षांत कमींत कमी १० मण ताग आणि २५ मण भात इतकें उत्पादन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**ब्रिटनमधील बुडालेल्या व्यापारी कंपन्या**—गेल्या वर्षी ब्रिटनमधील बुडणाऱ्या व्यापारी कंपन्यांच्या संख्येंत वाढ झाल्याचें मँचेस्टर गार्डिअन ह्या ब्रिटिश वृत्तपत्रानें नमूद केलें आहे. १९४८ मध्यें ३४५ कंपन्यांना आपला व्यवहार सक्तीनें बंद करावा लागला होता. १९४९ सालीं ५०० कंपन्यांना हा मार्ग अनुसरावा लागला. १९४८ सालीं १,१०० दिवाळी निघालीं होतीं; १९४९ सालीं १५०० दिवाळीं निघालीं.

**हिंदच्या घटनेचें वजन**—नुकत्याच अंमलांत आलेल्या हिंदुस्थानच्या प्रजासत्ताक घटनेच्या ग्रंथाचें वजन ४५ पौंड आहे. ज्यासाठीं वापरण्यांत आलेला कागद 'गोटस्किन पार्चमेंट' ह्या प्रकारचा असून तो कित्येक शतकें टिकणारा आहे असें म्हणतात.

**मद्रासचे गव्हर्नर आणि भविष्य**—मद्रास प्रांताचे गव्हर्नर भावनगरचे महाराज, ह्यांना फल ज्योतिषाच्या अभ्यासाचा बराच नाद आहे. ते आपल्या पत्रिकेंतील ग्रहांच्या स्थानांचा अभ्यास स्वतः मधून मधून मुद्दाम करवून घेतात. ताडपत्रावर लिहिण्याचें कसब ही ते सध्या शिकत आहेत. ही कला आता लुप्त होत चालली असली तरी कोचीन संस्थानांत दिवाणाच्या नेमणुकीपासून ते सांध्या कारटापर्यंत अनेक कामासाठीं ताडपत्रांचा उपयोग करण्यांत येत असे. मलबारमध्यें तर पत्रिकांसाठीं त्यांचाच उपयोग करण्यांत येत असे.

**हिंदमधील साबणाचे कारखाने**—साबणाच्या व्यापाराची परिस्थिती सुधारेपर्यंत नव्या साबणाच्या कारखान्यांना परवानगी द्यावयाची नाहीं असें हिंदुस्थान-सरकारनें ठरविलें आहे. सध्या हिंदुस्थानांत सुमारें ७० साबणाचे कारखाने आहेत. सरकारनें साबणाचें उत्पादन जास्तींत जास्त २,५४,००० टन ठरवून दिलें असून ह्या सर्व कारखान्यांची मिळून उत्पादन-क्षमताही येवढीच आहे. तथापि प्रत्यक्ष उत्पादन मात्र दरवर्षी सुमारें १,९०,००० टन एवढेंच होतें.

**फ्रान्समध्यें नवे कर बसणार नाहींत**—फ्रान्सच्या वरिष्ठ कायदेमंडळानें १९५० च्या अंदाजपत्रकांतून सर्व करांची हकालपट्टी केली आहे. कनिष्ठ सभागृहानें ४० दिवसांच्या वाद-विवादानंतर हे कर मंजूर केले होते. नवीन कर मंजूर झाले असते तर फ्रेंच सरकारचें उत्पन्न १४,१०० कोटी फ्रँकसनीं वाढलें असतें. कर जमेली धरून उत्पन्न २,२२,५०० कोटी फ्रँक्स झालें असतें. म्हणजे कर नामंजूर झाल्यानें अंदाजीं उत्पन्नांत ६ टक्के घट झाली.

**वृत्तपत्राच्या कागदाची निर्मिती**—हैदराबाद सरकारनें पुरस्कार केलेली शिरपूर पेपर मिल्स लि. ही कंपनी लवकरच वृत्त-पत्रांना लागणारा कागद तयार करूं लागेल. वृत्तपत्राचा कागद उत्पन्न करणारी हिंदुस्थानांतील ही पहिलीच कंपनी होईल. सध्यां कंपनी इंडस्ट्रिअल ट्रस्ट फंडाच्या अखत्यारांत आहे.

**हुंड्यावर कर घेण्याची सूचना**—स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाविषयीं नेमलेली कमिटी मद्रासमध्यें असतांना मच्छलीपट्टण नगरपालिकेच्या अध्यक्षांनीं कराची एक नवीन बाब सुचविली. स्थानिक स्वराज्य संस्थांनीं आपल्या कक्षेंतील विवाहप्रसंगीं देण्याघेण्यांत येणाऱ्या हुंड्यावर कर घ्यावा अशी सूचना त्यांनीं केली. त्याशिवाय विक्रीकर आणि करमणुकी-वरील कर ह्यांच्यांतही ह्या संस्थांना वांटा मिळावा असें त्यांचें म्हणणें आहे.

**डॉलर्स वांचविण्यासाठीं आयातीवर बंधनें**—डॉलर्सची बचत व्हावी म्हणून सिलोनच्या सरकारनें, तयार कपडे, मोटारी, रेडिओ, डबाबंद मांस, मासे, इत्यादि जिनसा आयात न करण्याचें ठरविलें आहे. जुलै १९४९ ते जून १९५० पर्यंत सिलोनला १·८ कोटी डॉलर्स मिळावयाचे होते. त्यापैकीं १ कोटी डॉलर्स आतांच खर्च झाल्यामुळें हा निर्बंध घालावा लागला आहे. बेटाच्या औद्योगिक विकासासाठीं जरूर असलेल्या यंत्रसाहित्याला मात्र आयातींत प्राधान्य दिलें जात आहे.

**हा पहा ब्रिटनमधील मध्यमवर्ग**—ब्रिटनच्या मध्यम-वर्गातील बरीच कुटुंबें आपल्या शिध्यांतील कृत्रिम लोणी, लोणी, तळणीचें तेल, अंडी, खवा इत्यादि पदार्थांचा पूर्ण हिस्सा घेत नाहींत असें आढळून आलें आहे. कांहीं भागांतून तर मांसही सर्वच्या सर्व घेण्यांत येत नाहीं. दुकानदारांच्या मतें ह्या घटनेला दोन कारणें आहेतः—(१) मर्यादित प्राप्ती आणि मोठें कुटुंब असणाऱ्या बऱ्याच नागरिकांना सर्व शिधा घेणें परवडत नाहीं; (२) तळणीसाठीं अगर परतण्यासाठीं लागणारें स्निग्ध तेल चांगल्या प्रतीचें उत्पादन करण्यांत येत नाहीं.

**हिंदी टंकलेखन यंत्रांचा पत्रव्यवहारासाठीं उपयोग**—हिंदु-स्थान सरकारच्या कचेऱ्यांतील हिंदी टंकलेखन यंत्रांचा उपयोग हिंदी पत्रव्यवहारासाठीं प्रथमच करण्यांत येणार आहे. हिंदचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांना जीं पत्रें हिंदींतून येतील त्यांचीं उत्तरें हिंदींतूनच द्यावी अशा सूचना देण्यांत आल्या आहेत. ह्यापूर्वी सर्व पत्रव्यवहार इंग्रजींतून चालत असे.

# अर्थ

बुधवार, ता. ८ फेब्रुवारी, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इनकम टॅक्सची घटक-राज्यांत वाटणी

इनकम टॅक्सच्या एकूण वसुलीपैकी घटक राज्यांच्या वाट्यास येणाऱ्या रकमेची नंतर सर्व घटक राज्यांत वाटणी कशी करण्यांत यावी, ह्याबाबत सर चिंतामणराव देशमुख ह्यांनीं दिलेला निर्णय जाहीर झाला आहे. संघराज्य सरकार आणि घटक-राज्य सरकारें ह्यांच्यामधील वाट्याविषयीं सूचना करण्याचा सर चिंतामणरावांना अधिकार नव्हता; तेव्हां सहाजीकच संघराज्य सरकारचा वाटा कमी करून घटक राज्यांचा वाढवावा, अशी मागणी सर चिंतामणरावांच्याकडे करण्यांत आली तरी तिचा कांहींहि उपयोग नव्हता. कांहीं घटक राज्यांनीं ७५% कर आपणांस मिळावा असें सुचविलें होतें. सध्या संघराज्य व घटक राज्य सरकारें ह्यांचा वाटा ५० : ५० असा आहे. प्रत्येक घटकास प्राप्तीवरील कराच्या वाटणींत सध्यापेक्षा मोठा हिस्सा हवा आहे; म्हणजे त्या सर्वांना संतुष्ट करणें कोणासच शक्य नव्हतें आणि नाहीं. प्रत्येक घटक राज्याची मागणी कमी-अधिक असली, तरी प्रत्येकाची मागणी अधिक मिळण्यासाठीं असल्यानें सर्वच घटक राज्य सरकारांना "देशमुख निर्णय" असमाधानकारक वाटत आहे. ह्या निर्णयाची अंमलबजावणी फार तर दोन वर्षें होणार असून येत्या अंदाजपत्रकांत त्याप्रमाणें तरतुदीस प्रारंभ होईल.

देशाच्या फाळणीमुळें कांहीं प्रांतांचे भाग पाकिस्तानांत समाविष्ट झाले. त्यामुळें, त्यांच्या वाटणीच्या इनकम टॅक्सच्या रकमेंत कपात करणें योग्यच होतें. त्या कपातीमुळें उरणारी रकम घटक राज्यांना पुन: वांटून दिली पाहिजे. सिंधचा व सरहद्दप्रांताचा ३, बंगालचा ७·५ व पंजाबचा ४ असा १४·५ युनिटसचा कोटा वाटणीसाठीं उपलब्ध झाला. आसामचा कांहीं भाग पूर्व पाकिस्तानांत गेला, तरी त्याची मूळ वाटणी कायम ठेवावी, असें ठरविण्यांत आलें. ह्या कोट्याची वाटणी सर चिंतामणराव देशमुखांनीं खालीलप्रमाणें सुचविली आहे:- मुंबई १, मद्रास २·५, बंगाल १, उत्तर प्रदेश ३, मध्यप्रदेश १, पंजाब १·५, बिहार २·५, ओरिसा १ व आसाम १.

आपल्या राज्यघटनेच्या २८० व्या कलमाप्रमाणें घटनेची अंमलांत आल्यापासून दोन वर्षांचे अवधींत राष्ट्राध्यक्षानें फिनॅन्स कमिशन नेमलें पाहिजे. हें कमिशन ह्या प्रश्नाचा तपशीलवार विचार करील, तोंपर्यंत "देशमुख निर्णय" बंधनकारक राहाणार आहे. पूर्वींचा "नीमायर निर्णय" आणि आतांचा "देशमुख निर्णय" ह्या दोन्हींना सर्वमान्य आधार नव्हता; भावी कमिशनला पुन: तेंच काम करावें लागणार आहे. घटक राज्यांतील लोकसंख्येला महत्त्व यावें, का तेथील वसुलीस प्राधान्य द्यावें, का तेथील गरजांकडे विशेष लक्ष द्यावें, हें ठरवावें लागेल. मुंबई व पश्चिम बंगाल ह्यांना कराच्या वसुलीचे प्रमाणांत वाटा हवा असणार, तर उत्तर प्रदेश आणि मद्रास आपल्या लोकसंख्येवर भर देणार. आसाम आणि ओरिसा हे आपल्या विशिष्ट गरजा जोरानें पुढें मांडणार. पंजाब भौगोलिक स्थानाचें महात्म्य सांगणार. ह्या सर्वांच्या मागण्या पुऱ्या करण्याची किमया कशी साधणार? संघराज्य सरकारलाहि घटक राज्य सरकारांप्रमाणेंच जादा उत्पन्नाची गरज आहेच आणि जमिनदारी नष्ट करण्याकर व दारूबंदीवर घटक राज्यांनीं आज खर्च करणें योग्य नाहीं असा आग्रह संघराज्य सरकार करीत आलेलेंच आहे. खरा प्रश्न घटक राज्यांना त्यांच्या वाढत्या गरजांस अनुसरून पुरेसे उत्पन्नाचे मार्ग कसे मिळतील, हा आहे. परंतु संघराज्य सरकारासहि त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीं वाढतें उत्पन्न हवेंच आहे. कराचे नवे मार्ग शोधून काढणें आणि त्याहि पेक्षा जनतेची मिळकत व संपत्ति वाढविणें आणि तिची कर देण्याची शक्ति सुधारणें, ह्यावरच अखेर सर्व कांहीं अवलंबून आहे.

## कृत्रिम अभ्रकाचें उत्पादन: भारतावर परिणाम

कृत्रिम अभ्रक तयार करण्याची पद्धति वॉशिंग्टनच्या नॅशनल ब्यूरो ऑफ स्टँडर्डसला सांपडली आहे. ह्या पद्धतीनें केलेला अभ्रक नैसर्गिक अभ्रकाच्या तोडीचा असून मोठ्या उष्णतामानास तोंड देण्याचे बाबतींत तर तो ज्यास्त उपयुक्त ठरला आहे. अभ्रकाचें युद्धसाहित्यांतील महत्त्वाचें स्थान सुप्रसिद्धच आहे. रेडिओ ट्यूब्ज, राडार साहित्य, कंडेन्सर्स, स्पार्क प्लग्ज, इत्यादींचे बनावटींत अभ्रकाची आवश्यकता असते. अमेरिकेचें अभ्रकाचा उपयोग करणाऱ्या राष्ट्रांत पहिलें स्थान आहे. त्यानें १९४८ मध्यें १०,००० टन अभ्रकाची आयात केली आणि स्वत: फक्त १३५ टनांचें उत्पादन केलें. अभ्रकाच्या शोधामुळें अमेरिकेचें अभ्रकासाठीं परदेशांवरील अवलंबन नष्ट होणार आहे. कृत्रिम अभ्रक मोठ्या प्रमाणावर तयार होऊं लागण्यास थोडा वेळ लागेल व तें महागहि पडेल. परंतु उत्पादनाचा खर्च कमी कसा करतां येईल, ह्याबाबत संशोधन चालू आहे. ब्राझील व भारत ह्यांतून अभ्रकाची निर्गत मोठ्या प्रमाणावर होते. तेव्हां कृत्रिम अभ्रकाचा शोध आपणांस परराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें घातुक ठरणार आहे.

## जागतिक बँकेकडून कर्जदार भारताची आर्थिक तपासणी

जागतिक बँकेचे प्रतिनिधी लवकरच दिल्ली येथें जाऊन भारताच्या आर्थिक परिस्थितीची छाननी करणार आहेत. कर्ज देतांना बँकेनें कसून तपासणी केल्यानंतर इतक्या लवकर पुन: तिनें हा खटाटोप करण्याचें प्रयोजन नव्हतें, असें मत दिल्ली येथें व्यक्त करण्यांत येत आहे. कर्जावरील व्याज देण्याची भारत सरकारची पात्रता आहे किंवा नाहीं, हें पहाण्याजोगी कोणती परिस्थिति निर्माण झाली आहे? कर्जदाराच्या व्यवहारावर नजर ठेवण्याची जागतिक बँकेची खबरदारी स्पृहणीय आहे, हें खास.

## ग्रेट ब्रिटनमधील स्त्री चार्टर्ड अकौंटंट

ग्रेट ब्रिटनमध्यें १२५ स्त्रिया चार्टर्ड अकौंटंट आहेत. त्यांपैकें २८ स्त्रिया चार्टर्ड अकौंटंटचा स्वतंत्र व्यवसाय करीत आहेत बाकीच्या ९७ पैकी ३१ स्त्रिया ह्या धंद्यांत नोकर म्हणून कामा आहेत, २४ स्त्रिया कंपन्यांतून काम करतात आणि ४२ स्त्रियां व्यवसाय इन्स्टिट्यूटला माहीत नाहीं. भारतामध्यें एकाहि स्त्री नांव चार्टर्ड अकौंटंटस्च्या पटावर नाहीं.

## बँकिंगचा खेडेगांवांतून प्रसार

### श्री. चिं. वि. जोग ह्यांची कमिटीपुढील साक्ष

रूरल बँकिंग चौकशी कमिटीपुढें साक्ष देण्यास श्री. चिं. वि. जोग, बी. कॉम., सी. आय. बी., सी. ए. आय. बी., ह्यांस निमंत्रण आलें होतें. त्याप्रमाणें त्यांची सोमवार, ता. ६ रोजीं मुंबई येथें साक्ष झाली. त्यांनीं आपल्या साक्षींत केलेल्या सूचना आतांपर्यंत सहकारी बँका किंवा मोठ्या व्यापारी बँका ह्यांच्या सूचनांपेक्षां स्वतंत्र आणि वेगळ्या स्वरूपाच्या आहेत, असें आढळून येईल. म्हणून त्यांच्या साक्षींचा गोषवारा आम्हीं येथें देत आहों. (श्री. जोग हे बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर असले, तरी त्यांचे हे विचार वैयक्तिक आहेत हें उघडच आहे. खेडेगांवांतून बँकिंगची वाढ कृत्रिम रीतीनें करणें इष्ट नाहीं; ही वाढ हळूहळूच होत गेली पाहिजे, हें त्यांच्या साक्षीचें सार आहे.)

बँकिंगचा खरा अर्थ केवळ ठेवी गोळा करणें हा नसून, त्याबरोबरच त्यापैकीं कांहीं रकमेचा विनियोग स्थानिक व्यापारास व व्यवहारास केल्याविना बँकिंगची खरी प्रगति होणार नाहीं. अडचणीचे वेळीं बँक उपयोगी पडेल, असा खातेदारांना विश्वास वाटला पाहिजे. केवळ मोठ्या नांवावर ठेवी मिळत नाहींत. तशा त्या मिळाल्या असत्या तर मोठ्या बँकांना ठेवींसाठी भिक्षापात्र अवलंबावें लागलें नसतें आणि दूरदूर उघडलेल्या शाखा बंद कराव्या लागल्या नसत्या. जनतेजवळील जादा शिलकी पैसा गोळा करून त्याचा सरकारी उपक्रमांसाठी विनियोग करणें हा बँकिंगच्या प्रगतीच्या योजनेचे मुळाशीं हेतु आहे, का खऱ्या-खुऱ्या अर्थानें बँकिंगची वाढ घडवून आणावयाची आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हा दुसरा हेतुच असेल, तर प्रगति मंद होणें अपरिहार्यच आहे.

खेडेगांवी प्रदेशांत बँकिंगचा प्रसार वाढविण्यास इंपीरिअल बँक हीच सर्वांत सोइस्कर संस्था आहे, कारण आजच तिच्या शाखांचें मोठें जाळें अस्तित्वांत आहे. ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या ह्यांचें ह्या बँकेच्या शाखांत रूपांतर करतां येईल. त्यामुळें त्यांचे व्यवहारहि सुधारतील. रेव्हेन्यू अधिकाऱ्यांची देखरेख अर्थातच कम रहणार नाहीं. हें काम हातीं घेण्यास लायक नोकरवर्ग इं. बँकेपाशीं आहे. इं. बँक हें काम पत्करण्यास तयार नसेल तर त्या बँकेचें राष्ट्रीयीकरण करून तिची व्यवस्था रिझर्व्ह बँकेकडे सोपविण्यांत यावी.

व्यापारी बँकांकडे हें काम सोपविण्याचें म्हटलें, म्हणजे अनेक गोष्टींचा विचार केला पाहिजे. उ. सरकारनें द्यावयाची सबसिडी, सरकारी पैशाच्या सुरक्षिततेसाठी नियंत्रण, इत्यादि. व्यापारी बँकांपैकीं कोणत्या बँकांकडे काम सोपविण्याचें त्यांची निवड रणें कठीण जाईल. फक्त कांहींचीच निवड केली, तर त्याचा कींच्यावर अनिष्ट परिणाम होईल, कारण बाकीच्या बँका कमी बूत आहेत असा लोकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. आजहि रिअल बँकेकडे लोकांचा ओढा रहातो, कारण तिला सरकारी ठबा थोडाफार आहे. ह्या कांहीं थोड्याशा व्यापारी बँका त्यांचे ष्ट्यपूर्ण स्थानाचा गाजावाजा करून इतर बँकांस त्याचा दुष्प-म भोगावा लागेल आणि इंग्लंडमधील बँकिंगप्रमाणें येथेंहि मोनोली निर्माण होईल. अशाच तऱ्हेच्या बँकिंगचा प्रसार सरच्या मनांत घडवून आणावयाचा आहे काय? तर मग सरला हें काम त्या त्या प्रदेशांतील बँकांना द्यावें लागेल; स्थानिक हितसंबंधांशीं परिचय असलेल्या बँका तें काम अधिक चांगल्या रीतीनें करूं शकतील. सहकारी बँकांजवळ साधारणपणें लायक नोकरवर्ग नाहीं; परंतु चांगल्या चालविलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँका उपयोगी पडतील; परंतु बऱ्याच बँकांना हें काम दिल्यानें सरकारला व रिझर्व्ह बँकेला प्रभावी नियंत्रण ठेवणें कठीण जाईल. ह्या दृष्टीनें इंपिरिअल बँक ही एकच बँक हें काम करण्यास योग्य ठरेल. व्यापारी बँकांना तें दिल्यास प्रत्येकाला द्यावयाच्या मदतीचें प्रमाण तिच्या परिस्थितीप्रमाणें ठरवून द्यावें लागेल. इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण शक्य नसेल, तर, सरकारनें तें काम रिझर्व्ह बँकेकडे सोपवावें, आणि ट्रेझऱ्या व सबट्रेझऱ्या ह्यांना तिच्या शाखा बनवावें.

हें काम सहकारी बँकांनीं मागावें असें त्यांचेजवळ विशेष काय आहे? सहकारी संस्थांचा मुद्दाम उदोउदो करून त्यांना चालना देण्याचा पद्धतशीर प्रयत्न सध्या चालू आहे. त्या केवळ व्यापारी बँकिंगच सहकारी नांवाखालीं करीत आहेत. खेडेगांवीं विभागांतील शेतीचा उत्कर्ष आणि शहरांतील उपभोक्त्यांच्या लहान वर्गाचें व्यापारी व सावकार ह्यांच्या छळापासून संरक्षण, हें सहकारी चळवळीचें खरें क्षेत्र होय.

---

### डेक्कन फर्निचर्स लि., नाशिक मध्यें प्रजासत्ताक दिन

नाशिक येथील डेक्कन फर्निचर्स लि. मध्यें प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडावंदनाचा समारंभ दे. भ. पोतनीस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं गंगापूर स्टोर्स एंजिनिअर श्री. जी. जी. धानक ह्यांचे हस्तें झाला. त्याप्रसंगी कंपनीचे चेअरमन श्री. वैशंपायन, महाराष्ट्र प्रां. कॉंग्रेसचे सेक्रेटरी श्री. यार्दी, मॅ. एजंट श्री. सातपूरकर, इत्यादींचीं भाषणें झालीं. कारखान्यांतील कांहीं यंत्रांचें प्रात्यक्षिकहि दाखविण्यांत आलें.

---

### मुं. प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटचा प्रजासत्ताक दिन

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटनें प्रजासत्ताक दिन ता. २६ जानेवारी रोजीं आपल्या विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंगमध्यें साजरा केला. ११-३० वाजतां अर्थमंत्री, श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांनीं ध्वजारोपण केलें आणि घटनेंतील उद्दिष्टें वाचून दाखवून आर्थिक समतेस घटनेंत कसें स्थान दिलेलें आहे, हें समजावून सांगितलें. सहकारी चळवळीचेंहि तेंच ध्येय आहे, असें स्पष्ट करून त्यांनीं भारताच्या महान पुढाऱ्यांच्या, विशेषतः महात्माजींच्या महान कार्याचा कृतज्ञतापूर्वक गौरवपर उल्लेख केला.

---

### लॉर्ड नॉर्मन ह्यांचा मृत्यु

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर लॉर्ड नॉर्मन (१९४४ पर्यंत मि. मॉंटेग्यू नॉर्मन) हे वयाच्या ७८ व्या वर्षी गेल्या आठवड्यांत मृत्यू पावले. १९२० ते १९४४ इतकीं वर्षे ते बँकेचे गव्हर्नर होते. इतर कोणत्याहि गव्हर्नरापेक्षा ते दीर्घकाळ त्या जागेवर होते. भाषणें किंवा मुलाखती ह्यांच्या भानगडींत ते कधीं पडत नसत.

---

### जागतिक बँकेचें कर्ज हवें, तर बजेटाची तोंडमिळवणी करा

सर्व घटक राज्यांनीं आपल्या १९५०-५१ च्या बजेटांत उत्पन्न खर्चाची तोंडमिळवणी करावी, असें सर्क्युलर संघराज्य सरकारनें घटकराज्य सरकारांकडे पाठविलें आहे. त्याविना जागतिक बँकेकडे भारत सरकारास कर्ज मागणें कठीण जाईल.

## प्रो. काळे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण

पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण शनिवार, ता. ४ फेब्रुवारी रोजीं अर्थमंत्री श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांच्या हस्तें झालें. त्यावेळीं बँकेचे चेअरमन श्री. ग. र. तुळशीबागवाले ह्यांनीं आपल्या भाषणांत, प्रो. काळे ह्यांनीं बँकेच्या कठीण काळांत तिचें मार्गदर्शन खंबीरपणें करून तिची घडी पुन: कशी नीट बसवून दिली, त्याचा इतिहास तपशीलवार निवेदन केला. रावसाहेब य. द. सोले ह्यांनीं प्रो. काळे ह्यांच्या आयुष्यक्रमाचा आढावा घेतला आणि श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांनीहि प्रो. काळे ह्यांच्या कार्यपद्धतीविषयीं कांहीं आठवणी सांगून त्यांच्या कामगिरीचें वर्णन केलें.

### श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांचें भाषण

श्री. वैकुंठभाई हे आपल्या विस्तृत भाषणांत म्हणाले:—

"प्रो. काळे ह्यांची अर्थशास्त्रज्ञ म्हणून सबंद हिंदुस्थानांत कीर्ति होती आणि त्यांचें नेतृत्व बाकीच्या सर्वांनीं पत्करलें होतें. त्यांच्या शुद्ध आर्थिक दृष्टिकोनामुळेंच ते सहकारी चळवळीकडे आकर्षिले गेले आणि त्या क्षेत्रांत त्यांना उच्च स्थान प्राप्त झालें. आर्थिक उद्धारास सहकारी संघटनेचीच आवश्यकता आहे, हें आज पटणारें सत्य त्यांनीं पूर्वीपासूनच प्रतिपादलेलें आहे. प्रांतिक सहकारी बँक व प्रांतिक इन्स्टिटयूट ह्यांचे द्वारा त्यांनीं सहकारी बँकिंगचे व शिक्षणाचे क्षेत्रांत मोल्यवान कामगिरी केलेली आहे. मुंबई प्रांतिक बँकिंग चौकशी कमिटीच्या रिपोर्टाचें बहुंशीं श्रेय त्यांनाच आहे. हा रिपोर्टच अद्यापीहि बँकिंगचे क्षेत्रांत मार्गदर्शक मानला जातो. त्यांचें टॅरिफ बोर्डावरील कामहि तेव्हांच्या रिपोर्टाचे द्वारा अजूनहि पाठीमागून येणारांना मार्गदर्शक होत आहे, असें मोलाचें तें काम झालें. जेथें सहकारी बँकिंगला वाव नाहीं, तेथें जॉइंट स्टॉक बँकिंगची वाढ व्हावी ह्याकरितां महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेचे कामीं पुढाकार घेऊन तिला उच्च दर्जा त्यांनीं प्राप्त करून दिला. वेगवेगळया नियतकालिकांतून त्यांचें लिखाण अखेरपर्यंत चालू होतें. महादेव गोविंद रानड्यांच्या ह्या थोर वारसदार, श्रेष्ठ पुरुषाची ही प्रतिमा आपणांस स्फूर्ति देत राहो."

प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं आपल्या आभारप्रदर्शनाच्या भाषणांत प्रो. काळे व श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या दोघांच्या सतत सहकार्याचा गौरवपर उल्लेख केला. ह्या जोडीनें सहकारी चळवळीस योग्य वळण लावण्याचें उत्कृष्ट काम केलें, असें ते म्हणाले. मुंबई प्रांतांत सहकारी चळवळीची, अभिमानास्पद प्रगति झाली, तिचें श्रेय ह्या दोघांस दिलें पाहिजे. अर्थशास्त्रज्ञ ह्या नात्याच्या प्रो. काळे ह्यांच्या श्रेष्ठ स्थानाचा त्यांनीं गौरवपर उल्लेख केला व रानड्यांची परंपरा चालू ठेवण्याचें त्यांनीं फार मोठें कार्य केलें ह्याविषयीं धन्योद्गार काढले.

प्रो. काळे ह्यांचें तैलचित्र सुप्रसिद्ध चित्रकार श्री. स. कृ. काळे ह्यांनीं काढलेलें असून तें चांगलें साधलें आहे.

---

**प्राथमिक शिक्षणाची व्याप्ति**---हिंदच्या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीं लखनौ शहरांतील प्राथमिक शिक्षणाची व्याप्ति वाढविली गेली आहे. ६ ते ११ वर्षे वयाच्या १४,००० मुली प्रथमच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कक्षेंत येणार आहेत. सध्या शहरांतील १८,००० मुलींपैकीं ४,००० मुली खाजगी अगर म्युनिसिपल शाळांतून प्राथमिक शिक्षण घेत आहेत.

## नोटीस.

### दी बँक ऑफ औंध लिमिटेड.

नोटीस देण्यांत येते कीं,

बँकेच्या भागीदारांची बारावी साधारण सभा रविवार ता. ५ मार्च १९५० रोजीं दुपारीं ४ (स्टँ. टा.) वाजतां बँकेचें हेड ऑफीस, १११–११२, सदाशिव पेठ, सातारा शहर येथें खालील कामाकरितां भरणार आहे.

१. ३१ डिसेंबर १९४९ अखेर संपलेल्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक व ऑडिटर यांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

२. डिव्हिडंड जाहीर करणें.

३. पाळीप्रमाणें निवृत्त होणारे डायरेक्टरांचे जागीं (ते फेरनिवडणूकीस पात्र असलेलें) नवीन डायरेक्टरांची निवडणूक करणें.

४. नवीन सालाकरितां ऑडिटर यांची नेमणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

सातारा.
ता. १ फेब्रुवारी १९५०

बोर्डाचे हुकुमावरून
बा. वा. घमंडे.
मॅनेजर

वि. सू.:— बँकेची ट्रॅन्स्फर बुकें ता. ५–३–५० ते १९–३–५० अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तें सोमवार तारीख २० मार्च १९५० पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंटस् भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पोस्टानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.


## सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.

स्थापना:—१९१२.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | १०,२४,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. | ११,२६,००० |
| खेळतें भांडवल | रु. | २,४९,६४,००० |

अध्यक्ष:— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

**बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.**

बँकेचे शेअर्सची विक्री चालू आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

सरकारची पूर्ण हमी असलेले शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालू आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिटया, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.

## मँगॅनीजचें उत्पादन व निर्गत

( भा. म. काळे. )

पोलादाच्या निर्मितीमध्यें मँगॅनीज या धातूला महत्त्व असल्यामुळें हिंदच्या निर्गत व्यापाराच्या दृष्टीनें मँगॅनीजला प्राधान्य आहे. डॉलर मिळवून देण्याच्या दृष्टीनें मँगॅनीजला महत्त्व आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत पोलादाचें उत्पादन निरनिराळ्या कार्यासाठीं वाढत्या प्रमाणांत होत असल्यामुळें मँगॅनीजचा खपहि साहाजिकच वाढत चालला आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी पोलादाच्या मालाचें एकंदर उत्पादन २३८० लक्ष टन झालें, तर १९४३ सालीं उत्पादनांचा आंकडा २६८० लक्ष टन होता. यापुढें जागतिक पोलादाच्या उत्पादनासाठीं हिंदच्या मँगॅनीजला निश्चितपणें जास्त प्रमाणांत मागणी येईल. कारखानदारांकडून विशेष मागणी आली म्हणजे मँगॅनीजचा भरपूर पुरवठा त्वरित होऊं शकतो असा आजपर्यंतचा अनुभव आहे. कारण खाणीमध्यें भरपूर पुरवठा असल्यामुळें मागणीप्रमाणें पुरवठा सहज वाढवितां येतो. पुढील एका वर्षांत सरकारनें दहा लक्ष टन मँगॅनीज निर्गत करतां येईल अशी योजना आखणें आजच्या परिस्थितींत योग्य ठरेल. इतकी निर्गत करतां आली तर सुमारें सहा कोटी रुपये मिळूं शकतील.

कांहीं वेळां असें मत व्यक्त केलें जात असें कीं मँगॅनीजसारखा उपयुक्त पदार्थ परदेशांत रवाना करूं नये, कारण मँगॅनीजचा सांठा संपला म्हणजे देशाची परिस्थिति बिकट होईल. परंतु अलिकडे अंतर्गत मँगॅनीजच्या साठ्याबद्दल उपलब्ध झालेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, हा साठा विपुल असल्यामुळें निर्गतीसाठीं मँगॅनीजचा उपयोग करणें योग्य आहे. गेल्या दोन वर्षांत हिंदनें निरनिराळ्या देशांशीं परस्पर व्यापारी करार केले आहेत. हे सर्व करार करतांना मँगॅनीजच्या मोबदल्यांत आवश्यक असा माल हिंदला पुरविण्याचें निरनिराळ्या देशांनीं कबूल केलें आहे. म्हणजे, दुर्मिळ चलन मिळविण्याचें मँगॅनीज हें महत्त्वाचें साधन आहे.

१९४९ सालीं मँगॅनीजची निर्यात सात लक्ष टन करावी असें व्यापारी खात्यानें ठरविलें होतें. आतां वाहातुकीच्या अडचणी दूर झाल्या असल्यामुळें १९५० सालीं दहा लक्ष टन मँगॅनीजची निर्यात करावयास कांहींच हरकत नाहीं.

पौंड व रुपया यांचें अवमूलन केल्यामुळेंहि मँगॅनीजच्या निर्गतीवर अनिष्ट परिणाम होणें शक्य नाहीं. कारण मँगॅनीज पोलादाच्या निर्मितीसाठीं आवश्यक आहे. मँगॅनीजची किंमत पूर्वी दर टनाला सुमारें रु. ७१ होती ती अवमूलनानंतर जवळ जवळ रु. ...२ झाली आहे. तरी त्याचा निर्गतीवर अनिष्ट परिणाम होणार ... म्हणजे निर्गत घटणार नाहीं. तेव्हां सध्यांची वाढती किंमत ...ीं खाणी–मालकांच्या दृष्टीनें उत्तेजनपर आहे. अर्थात, खाणी–मालकांनीहि दीर्घ–कालीन परिस्थिति लक्षांत घेऊनच निर्गत निश्चित केली पाहिजे.

अजून जर्मनी व जपान या देशांचा पोलादाचा धंदा सुरू व्हावयाचा आहे. मागासलेल्या देशांचें औद्योगीकरण व्हावयाचें ... जगाची लोकसंख्या वाढत चालली आहे. तेव्हां पोलादासाठीं मँगॅनीजची मागणी वाढतच जाणार आहे. सध्यांचा काळ मँगॅनीजच्या उत्पादन व निर्गत वाढविण्याला सर्वप्रकारें अनुकूल दिसतो.


**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

स्थापना–१९१७

फोन नं. १४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) ||| श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. ...ळवेकर B. A. LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदचें चहाचें उत्पादन व निर्यात

हिंदुस्थान हा देश जगांतील चहाच्या उत्पादनांत पहिला आहे. त्याचप्रमाणें चहाची निर्यातही तो सर्वांत अधिक करतो. १९४८ सालीं जगांत चहाचें एकूण उत्पादन ९३·८ कोटी पौंड झालें. त्यापैकीं सुमारें ५६ कोटी पौंडाहून अधिक उत्पादन हिंदुस्थानचें आहे. उत्पादनापैकीं ४२ कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला. १९४८ सालीं हिंदुस्थाननें सुमारें २९ कोटी पौंड चहा इंग्लंडला आणि ३ कोटी पौंड चहा अमेरिका, कॅनडा आणि दक्षिण अमेरिका ह्या देशांना निर्यात केला. हे तीन देश दुर्लभ चलनाचे म्हणजे डॉलरच्या कक्षेंतील आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

हिंदुस्थानांत सध्या दिवसेंदिवस चहा घेण्याची प्रवृत्ति वाढत चाललेली आहे. कारण, दूध घेणें बहुसंख्य लोकांना परवडतच नाहीं. परंतु चहा हें पेय आरोग्याला पोषक नाहीं. तव्हां हिंदुस्थानांतील लोकांनीं चहा घेण्याचें प्रमाण कमी करून त्याच्या निर्यातींत वाढ केली तर ते दोन्ही दृष्टींनीं उचित होईल. हिंदुस्थानला परदेशी दुर्लभ चलन अधिक मिळूं शकेल आणि नागरिकांच्या आरोग्यालाही मदत होईल. प्रत्यक्ष परिस्थिति मात्र उलट दिशेनें वळण घेत आहे. १९२८ सालीं हिंदुस्थानांत २ कोटी पौंड चहा खपला. १९३० सालीं खप ३·८ कोटी पौंडावर गेला आणि १९४५ सालीं त्यानें १५ कोटींपर्यंत मजल मारली! हिंदुस्थाननें आपल्या रुपयाची किंमत कमी केलेली आहे. तेव्हां चहाची निर्यात अधिक वाढविल्यास डॉलर्सच्या कक्षेंतील देश चहा अधिक प्रमाणांत घेण्याची शक्यता आहे. पाकिस्ताननें आपल्या रुपयाची किंमत कमी केलेली नसल्यामुळें त्या देशाला चहाची निर्यात करणें हिंदुस्थान इतकें सुलभ जाणार नाहीं. पाकिस्तानांत १९४८ सालीं ४·४ कोटी पौंड चहा निर्माण झाला. चहा आयात करणाऱ्या सर्व देशांची गरज पाकिस्तान भागवूं शकणार नाहीं.

## रशिआंतील [illegible] संशोधन आणि हिंदुस्थान

पुणें येथें नुकत्याच [illegible] ऊन गेलेल्या भारतीय शास्त्र-परिषदेला सोव्हिएट रशिआतर्फे तीन शास्त्रज्ञ आले होते. प्रो. एंगल हार्डट हे त्यापैकींच एक पाहुणे आहेत. प्रो. एंगल हार्डट ह्यांची त्यांच्या खास विषयावर ठिकठिकाणीं व्याख्यानें झालीं. परंतु दिल्ली विद्यापीठांत त्यांनीं केलेलें भाषण हिंदुस्थानांतील शास्त्रीय संशोधनासंबंधीं विशेष महत्त्वाचें आहे.

प्रो. एंगल हार्डट म्हणाले:—"रशियांत शास्त्रीय संशोधनाचा विकास कसा होत गेला ह्या संबंधींचा अभ्यास हिंदुस्थानच्या दृष्टीनें खास महत्त्वाचा आहे. कारण, रशियापुढें ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतिनंतर जे प्रश्न उभे राहिले तसेच प्रश्न आज हिंदुस्थानपुढें आहेत. रशिआंत क्रांति झाली त्यावेळीं देशांतील ९० टक्के जनता निरक्षर होती. देशांतील उद्योगधंद्यांचा विकास फारच अल्प प्रमाणावर झाला होता आणि बहुतेक सर्व प्रमुख उद्योगधंद्यांवर परकीय भांडवलाचें नियंत्रण होतें. गेल्या वीस वर्षांत रशिआनें आपली प्रगति फार वेगानें करून घेतली. त्यासाठीं कुशल नियोजन, शास्त्रीय संशोधनांतील मेळ आणि सामान्य माणसांतील आत्मीयतेची भावना, ह्या त्रयींचा रशिआनें उपयोग करून घेतला. आज रशिआजवळ शेकडों शास्त्रीय तज्ज्ञ आहेत आणि ते देशाच्या कोनाकोपऱ्यांत जाऊन इतरांना तज्ज्ञ बनवीत आहेत. रशिआंतील उद्योगधंदे स्वतः स्वतंत्र संशोधन करतात. परंतु, त्यांचें संशोधन आणि सरकारी संशोधन ह्यांचा मेळ घातलेला असतो."

प्रो. एंगल हार्डट ह्यांनीं आपल्या भाषणांत एका गोष्टीचा उल्लेख केलेला नाहीं. रशिआंत क्रांति झाल्यानंतर उत्पादनसाधनांची खाजगी मालकी नष्ट करण्यांत आली. ही मालकी नष्ट केली नसती, तर रशिआची एवढी आश्चर्यकारक प्रगति होऊं शकली नसती असा विचार पुष्कळदां व्यक्त करण्यांत येतो. तथापि उत्पादन-साधनें खाजगी मालकीचीं ठेऊन शास्त्रीय प्रगति होईल किंवा ती खुंटेल हा अजूनही विवाद्य प्रश्न आहे.

## घाऊक किंमतींचे निर्देशांक

( १९३९ ऑगस्ट = १०० )

| महिना १९४९ | अन्न पदार्थ | औद्योगिक कच्चा माल | अर्ध पक्का माल | पक्का माल | संकीर्ण | सर्व माल |
|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | ३८५·३ | ४१६·६ | ३२४·८ | ३३९·२ | ५३०·२ | ३७६·१ |
| फेब्रुवारी | ३८३·८ | ४५७·३ | ३२२·१ | ३३०·१ | ५२४·३ | ३७२·० |
| मार्च | ३७६·५ | ४६२·८ | ३२२·४ | ३२९·४ | ५१५·२ | ३७०·२ |
| एप्रिल | ३७३·८ | ४६२·८ | ३२५·२ | ३४७·० | ५२८·३ | ३७६·१ |
| मे | ३७७·० | ४६३·८ | ३२४·५ | ३४७·१ | ५२६·१ | ३७७·१ |
| जून | ३८१·६ | ४५९·७ | ३२६·३ | ३४९·२ | ५०२·३ | ३७३·३ |
| जुलै | ३९५·९ | ४४९·४ | ३२६·७ | ३४४·७ | ५३५·२ | ३८०·६ |
| ऑगस्ट | ४१०·६ | ४६०·५ | ३३०·८ | ३४३·६ | ५४१·६ | ३८९·० |
| सप्टेंबर | ४०३·१ | ४६८·५ | ३३५·० | ३४१·४ | ५४७·१ | ३८९·८ |
| ऑक्टोबर | ४०६·८ | ४७८·४ | ३३२·१ | ३५२·६ | ५८८·७ | ३९३·३ |
| नोव्हेंबर | ४०५·१ | ४७२·४ | ३३३·९ | ३४५·२ | ६१२·० | ३९०·२ |
| डिसेंबर | ३६५·८ | ४८०·० | ३३३·६ | ३४३·५ | ६२३·४ | ३७९·० |

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## हिंदचें चहाचें उत्पादन व निर्यात

हिंदुस्थान हा देश जगांतील चहाच्या उत्पादनांत पहिला आहे. त्याचप्रमाणें चहाची निर्यातही तो सर्वांत अधिक करतो. १९४८ सालीं जगांत चहाचें एकूण उत्पादन ९३·८ कोटी पौंड झालें. त्यापैकी सुमारें ५६ कोटी पौंडाहून अधिक उत्पादन हिंदुस्थानचें आहे. उत्पादनापैकी ४२ कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला. १९४८ सालीं हिंदुस्थाननें सुमारें २९ कोटी पौंड चहा इंग्लंडला आणि ३ कोटी पौंड चहा अमेरिका, कॅनडा आणि दक्षिण अमेरिका ह्या देशांना निर्यात केला. हे तीन देश दुर्लभ चलनाचे म्हणजे डॉलरच्या कक्षेंतील आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

हिंदुस्थानांत सध्या दुधाऐवजीं चहा घेण्याची प्रवृत्ति वाढत चाललेली आहे. कारण, दूध घेणें बहुसंख्य लोकांना परवडतच नाहीं. परंतु चहा हें पेय आरोग्याला पोषक नाहीं. तव्हां हिंदुस्थानांतील लोकांनीं चहा घेण्याचें प्रमाण कमी करून त्याच्या निर्यातींत वाढ केली तर तें दोन्ही दृष्टींनीं उचित होईल. हिंदुस्थानला परदेशी दुर्लभ चलन अधिक मिळूं शकेल आणि नागरिकांच्या आरोग्यालाही मदत होईल. प्रत्यक्ष परिस्थिति मात्र उलट दिशेनें वाढ घेत आहे. १९२८ सालीं हिंदुस्थानांत २ कोटी पौंड चहा खपला. १९३० सालीं खप ३·८ कोटी पौंडावर गेला आणि १९४५ सालीं त्यानें १५ कोटीपर्यंत मजल मारली! हिंदुस्थाननें आपल्या रुपयाची किंमत कमी केलेली आहे. तेव्हां चहाची निर्यात अधिक वाढविल्यास डॉलर्सच्या कक्षेंतील देश चहा अधिक प्रमाणांत घेण्याची शक्यता आहे. पाकिस्ताननें आपल्या रुपयाची किंमत कमी केलेली नसल्यामुळें त्या देशाला चहाची निर्यात करणें हिंदुस्थान इतकें सुलभ जाणार नाहीं. पाकिस्तानांत १९४८ सालीं ४·४ कोटी पौंड चहा निर्माण झाला. चहा आयात करणाऱ्या सर्व देशांची गरज पाकिस्तान भागवूं शकणार नाहीं.

## रशिआंत… संशोधन आणि हिंदुस्थान

पुणें येथें नुकत्याच …ऊन गेलेल्या भारतीय शास्त्र-परिषदेला सोव्हिएट रशिआतर्फे दोन शास्त्रज्ञ आले होते. प्रो. एंगल हार्डट हे त्यापैकींच एक पाहुणे आहेत. प्रो. एंगल हार्डट ह्यांची त्यांच्या खास विषयावर ठिकठिकाणीं व्याख्यानें झालीं. परंतु दिल्ली विद्यापिठांत त्यांनीं केलेलें भाषण हिंदुस्थानांतील शास्त्रीय संशोधनासंबंधीं विशेष महत्त्वाचें आहे.

प्रो. एंगल हार्डट म्हणाले:—"रशियांत शास्त्रीय संशोधनाचा विकास कसा होत गेला ह्या संबंधींचा अभ्यास हिंदुस्थानच्या दृष्टीनें खास महत्त्वाचा आहे. कारण, रशियापुढें ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतिनंतर जे प्रश्न उभे राहिले तसेच प्रश्न आज हिंदुस्थानपुढें आहेत. रशिआंत क्रांति झाली त्यावेळीं देशांतील ९० टक्के जनता निरक्षर होती. देशांतील उद्योगधंद्यांचा विकास फारच अल्प प्रमाणावर झाला होता आणि बहुतेक सर्व प्रमुख उद्योगधंद्यांवर परकीय भांडवलाचें नियंत्रण होतें. गेल्या वीस वर्षांत रशिआनें आपली प्रगति फार वेगानें करून घेतली. त्यासाठीं कुशल नियोजन, शास्त्रीय संशोधनांतील मेळ आणि सामान्य माणसांतील आत्मीयतेची भावना, ह्या त्रयींचा रशिआनें उपयोग करून घेतला. आज रशिआजवळ शेकडों शास्त्रीय तज्ज्ञ आहेत आणि ते देशाच्या कोनाकोपऱ्यांत जाऊन इतरांना तज्ज्ञ बनवीत आहेत. रशिआंतील उद्योगधंदे स्वतः स्वतंत्र संशोधन करतात. परंतु, त्यांचें संशोधन आणि सरकारी संशोधन ह्यांचा मेळ घातलेला असतो."

प्रो. एंगल हार्डट ह्यांनीं आपल्या भाषणांत एका गोष्टीचा उल्लेख केलेला नाहीं. रशिआंत क्रांति झाल्यानंतर उत्पादनसाधनांची खाजगी मालकी नष्ट करण्यांत आली. ही मालकी नष्ट केली नसती, तर रशिआची एवढी आश्चर्यकारक प्रगति होऊं शकली नसती असा विचार पुष्कळदां व्यक्त करण्यांत येतो. तथापि उत्पादन-साधनें खाजगी मालकीची ठेऊन शास्त्रीय प्रगति होईल किंवा ती खुंटेल हा अजूनही विचार्य प्रश्न आहे.

## घाऊक किंमतींचे निर्देशांक

( १९३९ ऑगस्ट = १०० )

| महिना १९४९ | अन्न पदार्थ | औद्योगिक कच्चा माल | अर्ध पक्का माल | पक्का माल | संकीर्ण | सर्व माल |
|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | ३८५·३ | ४१६·६ | ३२४·८ | ३३९·२ | ५३०·२ | ३७६·१ |
| फेब्रुवारी | ३८३·८ | ४५७·३ | ३२२·१ | ३३०·१ | ५२४·३ | ३७२·० |
| मार्च | ३७६·५ | ४६२·८ | ३२२·४ | ३२९·४ | ५१५·२ | ३७०·२ |
| एप्रिल | ३७३·८ | ४६२·८ | ३२५·२ | ३४७·० | ५२८·३ | ३७६·१ |
| मे | ३७७·० | ४६३·८ | ३२४·५ | ३४७·१ | ५२६·१ | ३७७·१ |
| जून | ३८१·६ | ४५९·७ | ३२६·३ | ३४९·२ | ५०२·३ | ३७३·३ |
| जुलै | ३९५·९ | ४४९·४ | ३२६·७ | ३४४·७ | ५३५·२ | ३८०·६ |
| ऑगस्ट | ४१०·६ | ४६०·५ | ३३०·८ | ३४३·६ | ५४१·६ | ३८९·० |
| सप्टेंबर | ४०३·१ | ४६८·५ | ३३५·० | ३४१·४ | ५४७·१ | ३८९·८ |
| ऑक्टोबर | ४०६·८ | ४७८·४ | ३३२·१ | ३५२·६ | ५८८·७ | ३९३·३ |
| नोव्हेंबर | ४०५·१ | ४७२·४ | ३३३·९ | ३४५·२ | ६१२·० | ३९०·२ |
| डिसेंबर | ३६५·८ | ४८०·० | ३३३·६ | ३४३·५ | ६२३·४ | ३७९·० |

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## उसाचें व साखरेचें दर एकरी उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

हिंद साखरेच्या धंद्याची परिस्थिति असमाधानकारक असण्याचें मुख्य कारण दर एकरीं उसाचें व साखरेचें उत्पादन इतर देशांतील उत्पादनाच्या मानानें फारच कमी आहे, हें होय. भारताच्या कांहीं भागांत साखरेचा उतारा ९% इतका कमी आहे; जावामध्यें तो ११·४९%, ऑस्ट्रेलियांत १४·३३% व क्युबांत १२·२५% आहे. उताऱ्याचें प्रमाण भारतांत खालींच जात चाललें आहे, म्हणजे उसाचा दर्जा कायम राहिलेला नाहीं.

भारतांतील साखरेचा उतारा.

| | |
|---|---|
| १९४४–४५ | १०·२१% |
| १९४५–४६ | १०·१२% |
| १९४६–४७ | ९·८८% |
| १९४७–४८ | ९·८५% |
| १९४८–४९ | ९·९७% |

भारतामध्यें दर एकरी उसाचें उत्पादनहि फार अल्प आहे आणि तें वाढविण्यास पुष्कळच वाव आहे. तें वाढलें म्हणजे उसाची किंमत चढीची रहाण्याचें कारण नाहीं व उतारा वाढल्यावर एकूण उत्पादनांतहि किफायतशीर वाढ होऊं शकेल. खालील तक्ता उद्बोधक आहे.

### ऊंस व साखर ह्यांचें तुलनात्मक उत्पादन

| देश | दर एकरीं उसाची निर्मिति | | साखरेचा उतारा | दर एकरीं साखरेचें उत्पादन | |
|---|---|---|---|---|---|
| | टन | मण | % | टन | मण |
| जावा | ५६·२० | १५३०·० | ११·४९ | ६·४४० | १७५·३० |
| पेरू | ४१·१४ | ११११·० | १२·३३ | ५·०७६ | १३८·१० |
| इजिप्त | ३०·४२ | ८२७·० | ९·९७ | ३·०३२ | ८२·५० |
| जपान-फोर्मोसा | २८·२७ | ७६९·३ | १२·९३ | ३·६६७ | ९९·५१ |
| ऑस्ट्रेलिया | २१·३४ | ५८०·६ | १४·३३ | ३·०९० | ८३·०८ |
| मॉरिशस | १९·६३ | ५३४·२ | १२·०८ | २·३७० | ६५·५१ |
| क्युबा | १७·१२ | ४६५·९ | १२·२५ | २·०९५ | ५७·०३ |
| भारत | १४·० | ३८०·० | ९·८० | १·३९४ | ३७·९५ |

## चार्टर्ड अकौन्टन्टस् परीक्षेचा निकाल

गेल्या नोव्हेंबर महिन्यांत चार्टर्ड अकौन्टन्टसूची जी परीक्षा झाली तींत उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्रीय उमेदवारांचीं नांवें पुढें दिलीं आहेत.

### संपूर्ण परीक्षेंत उत्तीर्ण

भिडे वामन गणेश, बोरकर भवानीशंकर शामराव, गुप्ते अरविंद दत्तात्रय, जठार श्रीकृष्ण प्रभाकर, काळे विठ्ठल गणेश, काणेकर मधुकर वामन, खाडिलकर पुरुषोत्तम दामोदर, किर्णाकर बाळकृष्ण जगन्नाथ, मेहेंदळे श्रीधर यशवंत, नाडकर्णी बाबूशंकर, नेरूरकर मंगेश शांताराम, पालकर गोविंद हरि, संत रमाकांत दीनानाथ, सरदेसाई पी. एन्., सोवनी चिमाजी धोंडो.

### फक्त दुसऱ्या विभागांत उत्तीर्ण

जोशी हरिशंकर लक्ष्मीनारायण, माडेकर वामन दत्तात्रय, पुरोहित नीळकंठ बाळकृष्ण, आपटे विश्वनाथ एम्., भागवत विष्णु विश्वनाथ, भिडे मधुकर गणेश, गोडबोले एम. व्ही., जोशी प्रभाकर गोपाळ.


बेडेकर चे मसाले वापरा

भोर स्टेट बँक लि.
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.
शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.
अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ६७,०००
बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. म. त्र्यं. शिगरे, अध्यक्ष.
न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. व. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी.
श्री. बा. ग. धंदुके.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्ष मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरी ५१५ बुधवार
अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. ) मॅनेजर.

Dr WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

उंची कपड्याचा व स्नानाचा
उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१। आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

## उसाचें व साखरेचें दर एकरी उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

हिंद साखरेच्या धंद्याची परिस्थिति असमाधानकारक असण्याचें मुख्य कारण दर एकरी उसाचें व साखरेचें उत्पादन इतर देशांतील उत्पादनाच्या मानानें फारच कमी आहे, हें होय. भारताच्या कांहीं भागांत साखरेचा उतारा ९% इतका कमी आहे; जावामध्यें तो ११·४९%, ऑस्ट्रेलियांत १४·३३% व क्युबांत १२·२५% आहे. उताऱ्याचें प्रमाण भारतांत खालींच जात चाललें आहे, म्हणजे उसाचा दर्जा कायम राहिलेला नाहीं.

| | भारतांतील साखरेचा उतारा. |
|---|---|
| १९४४–४५ | १०·२१% |
| १९४५–४६ | १०·१२% |
| १९४६–४७ | ९·८८% |
| १९४७–४८ | ९·८५% |
| १९४८–४९ | ९·९७% |

भारतामध्यें दर एकरी उसाचें उत्पादनहि फार अल्प आहे आणि तें वाढविण्यास पुष्कळच वाव आहे. तें वाढलें म्हणजे उसाची किंमत चढीची रहाण्याचें कारण नाहीं व उतारा वाढल्यावर एकूण उत्पादनांतहि किफायतशीर वाढ होऊं शकेल. खालील तक्ता उद्बोधक आहे.

**ऊंस व साखर ह्यांचें तुलनात्मक उत्पादन**

| देश | दर एकरीं उसाची निर्मिति | | साखरेचा उतारा | दर एकरीं साखरेचें उत्पादन | |
|---|---|---|---|---|---|
| | टन | मण | % | टन | मण |
| जावा | ५६·२० | १५३०·० | ११·४९ | ६·४४० | १७५·३० |
| पेरू | ४१·१४ | १११९·० | १२·३३ | ५·०७६ | १३८·१० |
| इजिप्त | ३०·४२ | ८२७·० | ९·९७ | ३·०३२ | ८२·५० |
| जपान-फोर्मोसा | २८·२७ | ७६९·३ | १२·९३ | ३·६६७ | ९९·५१ |
| ऑस्ट्रेलिया | २१·३४ | ५८०·६ | १४·३३ | ३·०९० | ८३·०८ |
| मॉरिशस | १९·६३ | ५३४·२ | १२·०८ | २·३७० | ६५·५१ |
| क्युबा | १७·१२ | ४६५·९ | १२·२५ | २·०९५ | ५७·०३ |
| भारत | १४·० | ३८०·० | ९·८० | १·३९४ | ३७·९५ |

## चार्टर्ड अकौन्टन्टस् परीक्षेचा निकाल

गेल्या नोव्हेंबर महिन्यांत चार्टर्ड अकौन्टन्टसूची जी परीक्षा झाली तींत उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्रीय उमेदवारांचीं नांवें पुढें दिलीं आहेत.

**संपूर्ण परीक्षेंत उत्तीर्ण**

भिडे वामन गणेश, बोरकर भवानीशंकर शामराव, गुप्ते अरविंद दत्तात्रय, जठार श्रीकृष्ण प्रभाकर, काळे विठ्ठल गणेश, काणेकर मधुकर वामन, खाडिलकर पुरुषोत्तम दामोदर, किर्णाकर बाळकृष्ण जगन्नाथ, मेहेंदळे श्रीधर यशवंत, नाडकर्णी बाबू शंकर, नेरूरकर मंगेश शांताराम, पालकर गोविंद हरि, संत रमाकांत दीनानाथ, सरदेसाई पी. एन्, सोवनी चिमाजी धोंडो.

**फक्त दुसऱ्या विभागांत उत्तीर्ण**

जोशी हरिशंकर लक्ष्मीनारायण, माढेकर वामन दत्तात्रय, पुरोहित नीळकंठ बाळकृष्ण, आपटे विश्वनाथ एम्., भागवत विष्णू विश्वनाथ, भिडे मधुकर गणेश, गोडबोले एन. व्ही., जोशी प्रभाकर गोपाळ.

बेडेकर चे मसाले वापरा

भोर स्टेट बँक लि.
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.
शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.
अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ६७,०००
बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. मु. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. श्री. बा. ग. चंदुके.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्ष मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठीं लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. ) मॅनेजर.

DR WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

उंची कपड्याचा व स्नानाचा उत्तम साबण निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गानिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.